# आधुनिक भारताच्या इतिहासात धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीत स्त्रियांचे योगदान

**प्रा.डॉ.भामरे नानाजी दगा**
**इतिहास विभाग प्रमुख , विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,अक्कलकुवा, जि. नंदुरबार.**




**प्रस्तावना:**

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून स्त्री सुधारणा चळवळीला सुरुवात झाली. महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा चळवळीला एक पुर्व पार्श्वभूमी आहे. पाश्चात्य शिक्षणाबरोबर आधुनिक जीवनमुल्ये भारतीय समाजात रुजू लागले. आणि समाज सुधारकांनी महिलांवर होणाऱ्या अन्यायाला विरोध करुन महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला. समाजाच्या उन्नतीसाठी ते भारतीय समाजातील दोष शोधू लागले. हा शोध घेत असतांना त्यांचे लक्ष भारतीय स्त्रियांच्या समस्यावर लक्ष केद्रींत झाले. समाजाचा हा घटक दुर्लक्षित राहिल्यास समाजाची सर्वांगींग उन्नती अशक्य आहे. यांची त्यांना जानीव निर्माण झाली. सुधारनांच्या बाबतीत पुरुष वर्ग आघाडीवर आहेत. पाश्चात्य देशांमध्ये स्त्री मुक्तीच्या चळवळीत स्त्रियांनीच नेतृत्व केले होते.[१] भारतात मात्र या कार्याचा शुभारंभ पुरुषांनी केलेला दिसून येतो.

महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी वि. रा. शिंदे, ईश्वरचंद्र विद्यासागरइत्यादी समाज सुधारकांनी सुरुवात केली. या समाज सुधारकांनी अंधश्रध्दामध्ये खितपत पडलेल्या समाजाला नवी आधुनिक दृष्टी देण्याचे कार्य केले. शब्दांना कृतीची जोड देवून महिला उध्दाराचे कार्य करणारे ज्योतिबा फुले हे स्त्री मुक्तीचे आद्य कैवारी ठरतात. त्यांनी स्त्री समस्यांचा विचार केला असे नाही तर मुंलीच्या शिक्षणाकडे लक्ष केद्रिंत केले आणि मुंलींची पहिली स्वतंत्र शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. महात्मा फुले यांचे कर्तृत्व महान आहे. त्यांच्या क्रांतीकारक विचाराला कर्तृत्वाची व आचरणाची जोड होती. स्त्री शिक्षण आणि अस्पृश्यांना शिक्षण देण्यासाठी हे त्यांनी आपले जीवनध्येय मानले होते. त्यांच्या या ध्येयपूर्तीच्या प्रवासात त्यांच्या सौभाग्यवती सावीत्रीबाई फुलेंचाही मोठया प्रमानात वाटा दिसून येतो.[२]

## सावीत्रीबाई फुले:-

महापूरुषांना जन्म देणारी, त्यांना घडविणारी ही स्त्रीच असते. महापूरुषांच्या कार्याला सतत प्रेरणा व बळ देण्याचे कार्य स्त्रीच करते. भारताच्या इतिहासात आपल्या तेजाने तळपळणाऱ्या अनेक स्त्रीया होवून गेल्या परंतु पतीच्या बरोबरीने स्वत:चे जीवन सामाजिक कार्यासाठी अपमान, तिरस्कार, संयमाने व मुकपणाने सहन करणारी स्त्री ही फक्त सावीत्रीबाई फुलेच दिसून येते. सामाजिक कार्य सतीचे वाण म्हणून स्विकारले ती महात्मा फुलेंची सहचारिणी सावीत्रीबाई फुले होय. समाज परिवर्तनाच्या चळवळीत त्या पुरुषांच्या कार्यात सावली सारख्या राहिल्या.[३]

समाज सुधारणेचा हा गजर हा प्रथम महाराष्ट्रात सुरु झाला.त्यांच्या या कार्याने महाराष्ट्रात नवयुगाची प्रभात सुरु झाली. एवढेच नव्हे तर त्यातून भारतीय समाजक्रांतीचा प्रांरभ सुरु झाला. स्त्री ही मातृत्वाची प्रतिक आहे. तिला शिक्षणापासून वंचित ठेवणे हा मोठा गुन्हा आहे. तिला शिक्षण देणे निकडीचे आहे. असे स्वामी विवेकानंद म्हणतात. स्त्री सुधारणा कार्यात सावीत्रीबाई फुले प्रमाणे इतरही महिला पुढे आल्या. त्यामध्ये रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई, ताराबाई शिंदे, मिस सोराबाई, काशिबाई कानिटकर, अनुसयाबाई काळे इत्यादी चुल आणि मुल यात गुंतून न पडता घराचा डंबरठा ओलांडणारी व सामाजिक कार्यात भाग घेणारी महाराष्ट्रातील पहिली स्त्री सावीत्रीबाई फुले याच होय. असा गौरवपुर्ण उल्लेख प्रधान ग.बा. सरदार करतात. समाज परिवर्तनाच्या चळवळीत हया फुलेंच्या कार्यात केवळ सावली सारख्याच उभ्या राहिल्या नाहित तर स्वत:च्या स्वतंत्र प्रज्ञेने, चिंतनाने त्यांनी फुलेंचे विचार स्विकारले. त्यामुळे सावीत्रीबाईंच्या कार्याचाही विचार करणे अपरिहार्य ठरेल. सनातनी लोकांनी कितीही विरोध केला तरी सत्याचा विजय होईलच यांवर त्यांचा पुर्ण विश्वास होता. सावीत्रीबाईनी अस्पृश्य उध्दाराचे देखील कार्य मोठया प्रमाणावर केले आहे. त्याचबरोबर त्यांनी निपुत्रीकतेचे कटू सत्यही पचवले. आणि अनाथ ब्राम्हण मुलाला दत्तक घेवून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. बालहत्या प्रतिबंधक गृहातल्या अनाथांचे त्यांनी मातृत्व व पितृत्व देखील स्विकारले.[४]

भारतीय समाजामध्ये जातिभेद, वर्णभेद, बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, अंधश्रध्दा इत्यादी वाईट रुढी चालीरीतीनी हा समाज ग्रासलेला होता. शिक्षणातून समाज जागृती करुन अंधश्रध्दा वाईट चालीरीती खुळचट पंरपरा इत्यादींना मुठमाती देवून संपुर्ण स्त्री वर्गाचा उध्दार करण्याचे कठीण व्रत सावीत्रीबाईनी चालविले.[५] हिंदुधर्म व्यवस्थेनुसार भारतातील स्त्रीयांना शिक्षणाची बंदी होती. अज्ञानामुळे काळीमा फासणारे

हे प्रकार घडले. वाईट गोष्टींना आळा घालणे गरजेचे होते. हे प्रथम ज्योतिबांनी ओळखले. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उध्दारी अशी मराठीत म्हण आहे. पंरतू आमची मराठी माय अगदी अक्षरशत्रू ती झोका देवून बाळाला गुंगी आणते. परंतू संस्काराचे काय ? हा प्रश्न होता. हे ज्योतिबांना कळले. सावीत्रीबाई या मुळातच जिज्ञासू असल्यामुळे त्यांनी थोडयाच दिवसात ज्योतिबांनी दिलेले सर्वज्ञान आत्मसाद केले आणि आपल्या भोवतालचा अज्ञान अंधकार दुर करण्यासाठी सावीत्रीबाई फुले क्रांतीज्योती बनल्या. अज्ञान, अंधश्रध्देपासून मुक्त होण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही म्हणून सावीत्रीबाईंना शिकवले. पहिली भारतीय शिक्षिकेचा बहुमान सावीत्रीबाईना मिळाला. त्यांनी सर्व स्त्रियांचे जीवन प्रकाशमय केले.[६]

### पंडिता रमाबाई:-

एकोणिसाव्या शतकात स्त्रिंयांच्या उध्दारासाठी, स्त्रियांच्या मुक्ततेसाठी ज्या ज्या ख्रिस्ती मिशनरीनी व या देशातील सुधारकांनी आटोकाट प्रयत्न केले. या प्रयत्नाामध्ये पंडिता रमाबाईची भुमिका देखील महत्वाची आहे. त्यांनी महाराष्ट्रातील बालविधवांच्या जीवनात नवा आशेचा किरण निर्माण केला. त्यांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण केला.[७]

कर्नाटकात मंगरुळ जवळील गंगामुळ हे त्यांचे जन्मगांव होते. आई-वडिलांच्या निधनानंतर त्या कलकत्ता येथे आल्या. कलकत्यात रमाबाईनी आपल्या विध्दतेने मोठमोठया पंडितांनाही चकित केले. पंडिता रमाबाईची गणना कर्ते समाज सुधारक म्हणून करावी लागेल. आधी केले व मग सांगितले या न्यायाप्रमाणे त्यांनी आपले समाजकार्य चालु ठेवले रमाबाईनी स्वतः बिपिन बिहारी दास यांच्यासोबत आंतरजातिय विवाह केला.[८]

एकोणिसाव्या व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्री शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. पुरुषांपेक्षा स्त्री शिक्षणाचे प्रमाण अतिशय अल्प अशा प्रकारचे होते. स्त्री शिक्षणासाठी प्रांरभीच्या काळात महात्मा फुले, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, वि. रा. शिंदे इत्यादी समाज सुधारकांनी मोठया प्रमानात प्रयत्न केलेले दिसतात. १८५५-५८ या काळात ईश्वरचंद विद्यासागर यांनी बंगालमध्ये मुंलीसाठी ४० शाळा काढल्या. मोफत शिक्षण दिले. पाठयपस्तकेही मोफत दिली. त्याचबरोबर देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन यांनीही बंगालमधील मुंलीच्या शिक्षणासाठी महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे.[९]

भारतीय समाज हा शिक्षणाच्या बाबतीत अतिशय मागासलेला होता. अशा स्थितीत स्त्री शिक्षणाचा विचार कोण करणार स्वतःचा विकास करण्याचे स्त्रीला स्वातंत्र्य नव्हते. बालविवाह या प्रथेमुळे शाळेत जावून शिकायच्या वयात त्यांना मातृत्व निर्माण होत होते. त्यांच्यातील मी पण हरवून जात होते. त्या म्हणतात की त्या काळातील स्त्रीला स्वातंत्र्य म्हणजे काय ? हे माहित नव्हते. तरी त्या बंधनात सुखी राहत होत्या. आणि समाधानी होत्या.[१०]

पंडिता रमाबाईची महाराष्ट्रातील स्त्रियांच्या उध्दारासाठी, स्त्रियांच्या मुक्ततेसाठी केलेल्या प्रयत्नामध्ये फार महत्वाची भुमिका आहे. त्यांनी विधवा व बालविवाह महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. विधवा स्त्री शिक्षणाचा पाया घातला. विधवा शिक्षणाचे कार्य स्वबळावर केले. त्यांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे त्यांच्या जीवनाला एक वेगळे जीवन मिळाले. बालविवाहाच्या उध्दारासाठी शारदा सदनची स्थापना केली. रमाबाईनी केवळ विधवांचीच सेवा केली नाही तर प्लेग व दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या दूदैवी स्त्रियांचीही सेवा केली. मध्य भारतातून व उत्तर भारतातून त्यांनी या स्त्रियोना आपल्या आश्रमात आणले. व त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले आणि स्वालंबी बनवले.[११]

आर्य महिला समाज या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांमध्ये स्वाभिमानाची व्याख्याने देण्यास प्रांरभ केला. भारतीय शिक्षणाच्या आढाव्यासाठी नेमलेल्या हंटर कमिशन समोर १८८२ मध्ये त्यांनी साक्ष देतांना स्त्री शिक्षण व स्त्री डॉक्टरची किती मोठया प्रमाणात गरज आहे असे त्यांनी पटवून दिले. त्यामुळे त्या यादीत भर पडली.[१२]

आजच्या स्त्री मुक्ती चळवळीच्या किती तरी आधी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत पंडिता रमाबाईनी आपल्या मानवतावादी कर्माने आधुनिक महराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

### ताराबाई शिंदे :-

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात कर्तृत्वान स्त्रियांचा आढावा घेतांना प्रस्थापित समाज व्यवस्थेला जागृत करणारे प्रश्न विचारणाऱ्या ताराबाई शिंदे यांचे १८८२ मध्ये विचार प्रसिध्द झाले. त्यांचा स्त्री-पुरुष तुलना हा निबंध विचारात घ्यावा लागतो. महात्मा फुले यांच्या विचारांचा व सत्यशोधक चळवळीचा प्रभाव त्यांच्या लेखनावर निश्चित पडलेला दिसून येतो.[१३] या निबंधात सुसंगतपणे व अत्यंत परखडपणे प्रभाव त्यांच्या लेखनात निश्चिपणे उमटलेला दिसतो. स्त्री व पुरुष यांच्यातील नात्याविषयी व स्त्रीला मिळालेल्या दुय्यम स्थानाविषयी चर्चा केलेली आहे. त्यांनी पुरुषांना प्रश्न विचारला एक बायको मेल्यास पुरुष दुसरी बायको करतो पण नवरा मेल्यास दुसरा नवरा का नाही ? बायकांनी सती जाणे पण नवऱ्यांनी सता का जावू नये. स्त्रीने व्यक्तीचार केल्यास तिला सजा, मात्र पुरुषांनी केल्यास त्याला कोणताही कलंक का नाही ? असे व्यवहारी पण मुलभूत प्रश्न त्या विचारतात. पुशरुषांना सर्व प्रकारचे विशेषाधिकार व स्त्रियांना मात्र गुलामीचे जिणे यांवर प्रकाश टाकून स्त्री-पुरुष यांच्या अधिकारात भेद करणाऱ्या चुल आणि मुल व्यवस्थेला त्यांनी आव्हान दिले आहे.[१४]

विधवांची दुरावस्था, पडदा पध्दती, सतीची चाल, बहुपत्नीत्व, बालविवाह अशा अनेक रुढींमुळे स्त्रियांची होणारी दूर्दशा यावंर टिका केली. ताराबाईनी तत्कालीन प्रतिकुल परिस्थितीतील स्त्रियांच्या दु:खाविषयी अत्यंत परखडपणे मते मांडून स्त्री मुक्तीचा खऱ्या अर्थाने पुरस्कार केलेला दिसून येतो.[१५]

**साराशः-**

ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे इत्यादी स्त्रियांनी स्त्री मुक्तीचा खऱ्या अर्थाने पाया रचलेला दिसतो.त्यांना समतेचे व शिक्षणाचे महत्व जाणल्यामुळे या कार्यासाठी अवहेलना सहन करुनही स्त्री मुक्तीचे मानवतावादी कार्य निष्ठेने केले. त्यांच्या कतृत्वामुळेच आज समाजात स्त्रियांना त्यांची गोड फळे चाखयला मिळाली. त्यांच्या कार्याचे महत्व तत्कालीन ब्रिटिश सरकारने ओळखले होते व म्हणून सावीत्रीबाई फुले यांचा सरकारने शाल व २०० रुपये देवून सत्कार केला होता. तर पंडिता रमाबाईना कैसर-ई-हिंद ही सन्मानदर्शक पदवी प्रदान केली होती. अशा या सर्वच स्त्री मुक्तीच्या समाज सुधारिकांना व त्यांच्या कतृत्वाला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथः-**

१) शहा घनश्याम (अनुवाद प्राची चिकटे)-भारतीय सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००४, पृं. क्रं. १२७.
२) कुलकर्णी सुहास व चंपानेरकर मिलिंद (संपा.)- यांनी घडवल सहस्त्रक, रोहण प्रकाशन पुणे, जुलै २००६, पृ. क्रं. १८२-१८८.
३) पवार ना. ग. - सावीत्रीबाई फुले, अष्टपैलू व्यक्तीमत्व, पन्दगंधा प्रकाशन पुणे, २००४, पृ. क्रं. १६४.
४) उपरोक्त -पृ. क्रं. १६६.
५) उपरोक्त -पृ.क्रं. १७०.
६) माळी मा. गो.- क्रांतीज्योती सावीत्रीबाई ज्योतिराव फुले, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस, ठाणे, १९८०.पृ.क्रं. ११५.
७) गाठाळ एस. एस. -भारतीय स्त्रियांचा इतिहास व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद २०१३, पृ.क्रं. १०८.
८) उपरोक्त - १०८.
९) ग्रोवर बी. एल. व यशपाल - आधुनिक भारत का इतिहास, एस. चन्द एण्ड कम्पनी लि. नई दिल्ली २००३, पृ.क्रं. २८२-२८३.
१०) उपरोक्त -पृ. क्रं. २८३.
११) गाठाळ एस. एस. -भारतीय स्त्रियांचा इतिहास व स्त्री जीवन, पृर्वोक्त पृ. क्रं.१०९-११४.
१२) उपरोक्त -पृ. क्रं. १०९.
१३) उपरोक्त -पृ.क्रं१०३- १०४.
१४) उपरोक्त - पृ. क्रं.१०७.
१५) लांजेवार ज्योती - फुले - आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन नागपूर, २००८ पृ.क्रं.१४५.